Innovate • Integrate • Deliver

# प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : 'प्राज टॉवर' स.नं. २७४ आणि २७५/२,
भूमकर चौक-हिंजेवाडी रोड, हिंजेवाडी, पुणे : ४११ ०५७
सीआयएन : एल२७१०१पीएन१९८५पीएलसी०३८०३१
दूरध्वनी : +९१ २० ७१८० २००० /२२९४ १०००
फॅक्स : +९१ २० २२९४ १२९९ इमेल : info@praj.net
वेबसाईट : www.praj.net

## सूचना

### ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची व दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाविषयीच्या माहितीची सूचना आणि बुक क्लोजर

सदर सूचनेद्वारे असे कळविण्यात येत आहे की प्राज इंडस्ट्रीज् लि. (कंपनी ) ची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (ए.जी.एम.) मंगळवार, दि. २३ जुलै २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता प्राज टॉवर, सर्व्हे क्र. २७४ व २७५/२, भूमकर चौक-हिंजवडी रोड, हिंजवडी, पुणे ४११०५७ ह्या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात भरविण्यात येईल.

ए.जी.एम. ची सूचना व वार्षिक अहवाल, अटेन्डन्स स्लिप व प्रॉक्सी फॉर्म सहित, ज्या सभासदांनी आपले ई-मेल आयडी कंपनीकडे अथवा डिपॉझीटरी पार्टीसिपंटकडे नोंदणीकृत केले आहेत अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ईमेल द्वारे पाठविण्यात आले आहेत. अर्थात ह्या सूचनेची व अहवालाची छापील प्रत हवी आहे अशी विनंती ज्यांनी केली आहे ते सभासद व ज्या सभासदांनी कंपनीकडे किंवा डिपॉझीटरी पार्टीसिपंटकडे आपला ई-मेल आयडी नोंदवलेला नाही अशा सर्वांना छापील प्रती पाठवण्यात आल्या आहेत.

ए.जी.एम. ची सूचना व वार्षिक अहवाल कंपनीच्या www.praj.net ह्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. ए. जी. एम. ची सूचना सेंट्रल डिपॉझीटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सी. डी . एस.एल.) च्या www.evotingindia.com ह्या संकेत स्थळावरसुद्धा उपलब्ध आहे. ज्या सभासदांना ए.जी.एम. ची सूचना व वार्षिक अहवाल मिळाला नसेल त्यांनी तो कंपनीच्या संकेत स्थळावरून डाउनलोड करावा किंवा त्याची प्रत मिळण्यासाठी investorsfeedback@praj.net ला ईमेल पाठवावी किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाकडे तशी लेखी विनंती करावी. ए.जी.एम.मधील कामकाजा संबंधीची सर्व कागदपत्रे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सर्व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार हे साप्ताहिक सुट्टीचे दिवस आहेत) व वेळेत ए.जी.एम.च्या दिवसापर्यंत तपासणीसाठी ठेवण्यात आली आहेत.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि तद्नुषंगिक नियमांनुसार व सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स , २०१५ चे रेग्युलेशन ४२ नुसार असे सूचित करण्यात येत आहे कि, सभासदांची नोंदवही आणि संस्थेच्या भाग हस्तांतर वह्या ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वर्षाचा लाभांश मिळवण्यासाठी हक्कदार असलेल्या सभासदांची नावे निर्धारित करण्यासाठी आणि ए.जी.एम. च्या निमित्ताने बुधवार दि. १७ जुलै, २०१९ ते मंगळवार दि. २३ जुलै,२०१९ (दोन्ही दिवसांसह) बंद राहतील. शिफारस केलेला लाभांश मंजूर झाल्यास, दि. १६ जुलै, २०१९ रोजी सभासदांच्या नोंदवहीमध्ये नाव असणाऱ्या सभासदांना, दि. ३० जुलै, २०१९ किंवा त्यानंतर देण्यात येईल.

कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८ च्या तरतुदी, व त्या सोबत कंपनीज (मॅनेजमेंट आणि ॲडमिनीस्ट्रेशन नियम , २०१४ चा नियम क्र . २० व सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५चे रेग्युलेशन ४४(१) विचारात घेता, ज्या सभासदांकडे कंपनीचे भाग कागदी (physical) किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात अंतिम तारखेपर्यंत (म्हणजेच दि. १६ जुलै, २०१९ रोजी) असतील त्यांना ए.जी.एम.मधील कामकाजाच्या सर्व मुद्द्यांवर सी.डी.एस.एल. च्या दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने (ए.जी.एम. स्थळ सोडून) मतदान करण्याची सुविधा कंपनी उपलब्ध करून देत आहे.म्हणून सर्व सभासदांना असे कळविण्यात येत आहे की:

१. ए.जी.एम.च्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्वसाधारण व विशेष कामकाजाविषयी मतदान दूरस्थ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करता येईल.

२. ए.जी.एम.ची सूचना व वार्षिक अहवाल पाठवण्याचे कार्य दि. २६ जुन, २०१९ रोजी पूर्ण झाले.

३. दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान **शनिवार दि. २० जुलै, २०१९ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ९. ०० वाजता सुरु होईल.**

४. दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान **सोमवार दि. २२ जुलै, २०१९ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ५.०० वाजता समाप्त होईल.**

५. दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान सोमवार दि. २२ जुलै, २०१९ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ५. ०० नंतर करता येणार नाही.

६. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा मत-पत्रिकेद्वारे मतदान करण्याची पात्रता नक्की करण्याची अंतिम तारीख मंगळवार दि. १६ जुलै, २०१९ अशी आहे.

७. ए.जी.एम.ची सूचना पाठविलेल्या तारखे नंतर एखादी व्यक्ती कंपनीची भागधारक झाली व मंगळवार दि. १६ जुलै, २०१९ ह्या अंतिम तारखेला तिच्याकडे कंपनीचे भाग असले तर तिने ०२०-२६१६००८४ ह्या क्रमांकावर दूरध्वनी करून किंवा sandip.pawar@linkintime.co.in इथे ईमेल पाठवून सिक्वेन्स क्र. प्राप्त करून घ्यावा. परंतु असा भागधारक जर ह्याआधीच दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानासाठी सी.डी.एस.एल.कडे नोंदणीकृत असेल तर त्याने आधीचाच सिक्वेन्स क्र. व पासवर्ड वापरावा.

८. मत-पत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा ए.जी.एम.मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल व ज्या सभादांनी दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे आपले मत नोंदवलेले नाही त्यांनाच मत - पत्रिके द्वारे आपले मत देण्याचा अधिकार असेल.

९. ए.जी.एम.च्या आधी ज्या सभासदांनी दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान केले आहे त्यांना देखील ए.जी.एम.मध्ये उपस्थित राहता येईल पण त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

१०. इलेक्ट्रॉनिक मतदानाविषयी काही माहिती हवी असल्यास www.evotingindia.com येथील फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (FAQs) किंवा हेल्प सेक्शन मधून ई-मतदान माहितीपत्रक वाचावे. किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवावी. ई-व्होटिंग विषयी काही माहिती हवी असल्यास किंवा काही तक्रारी असल्यास investorsfeedback@praj.net इथे ईमेल पाठवावी. किंवा-श्री. अनंत बवरे, जॉईंट जनरल मॅनेजर आणि सहाय्यक कंपनी सचिव ह्यांच्याशी किंवा श्रीमती निमा जोहरे, डेप्यूटी जनरल मॅनेजर - सेक्रेटरिअल ह्यांच्याशी +९१ २० ७१८०२००० / २२९४१००० ह्या क्रमांकांवर संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
दत्तात्रय निंबोळकर
चीफ इंटर्नल ऑडिटर व कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : पुणे
दिनांक : २७ जुन, २०१९

### ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी परिवहनाची सोय

३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला येण्याकरिता कंपनीने वाहनांची सोय डेक्कन जिमखाना भागातून केली आहे. ज्या सभासदांना या सुविधेचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी आपली नावे १७ जुलै, २०१९ रोजी सायंकाळी ५.०० च्या आत श्री. राजू मोरे (दूरस्थ क्रमांक ९८९०३००१८६) यांच्याकडे द्यावीत किंवा investorsfeedback@praj.net येथे ईमेल पाठवावी. दि. १७ जुलै २०१९ नंतर आलेल्या नावांचा कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.